# श्रीगणपती स्तोत्र

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीगुरुचरणारविंदाम्यां नमः ॥
॥ अथ श्रीगणपतिस्तोत्रप्रारंभः ॥

जयजयाजी गणपति ॥ मज द्यावी विपुल मति ।
करावया तुमची स्तुति ॥ स्फूर्ति द्यावी मज अपार ॥ १ ॥

तुझें नाम मंगलमूर्ति ॥ तुज इंद्र, चंद्र ध्याती ॥
विष्णुशंकर तुज पूजिती ॥ अव्यया ध्याती नित्यकाळीं ॥ २ ॥

तुझें नांव विनायक ॥। गजवदना तूं मंगलदायक ॥
सकळ नाम कलिमलदाहक ॥ नामस्मरणें भस्म होती ॥३॥

मी तव चरणांचा अंकित ॥ तव चरणां माझें प्रणिपात।।
देवाधिदेवा तूं एकदंत ॥ परिसें विज्ञापना एक माझी ॥ ४ ॥

माझा लडिवाळ तुज करणें ॥ सर्वापरी तूं मज सांभाळणें ॥
संकटांमाझारी रक्षिणें । सर्व करणें तुज स्वामी॥ ५ ॥

गौरीपुत्रा तूं गणपती ॥ परिसावी सेवकाची विनंती ।
मी तुमचा अनन्यार्थी ॥ रक्षिणें सर्वार्थेंचि स्वामिया ॥ ६ ॥

तूंच माझा बापमाय ।। तूंच माझा देवराय ॥
तूंच माझी करिसी सोय || अनाथनाथा गणपति ॥ ७ ॥

गजवदना श्रीलंबोदर। || सिद्धिविनायका भालचंद्रा ।
हेरंबा शिवपुत्रा ॥ विघ्नेश्वराअनाथबंधु ॥ ८ ॥

भक्तपालका करी करुणा ॥ वरदमूर्ति गजानना |

परशुहस्ता सिंदूरवर्णा ।। विघ्ननाशना मंगलमूर्ति ॥९॥

विश्ववदना विघ्नेश्वरा ॥ मंगलाधीशा परशू- धरा ॥
पापमोचना सर्वेश्वरा ॥ दीनबंधु नाम तुझें ॥ १० ॥

नमन माझें श्रीगणनाथा ॥ नमन माझें विघ्नहर्ता ॥
नमन माझें एकदंता ॥ दीनबंधु नमन माझें ॥११॥

नमन माझें शंभुतनया ॥ नमन माझें करुणालया ॥
नमन माझें गणराया ॥ तुज स्वामिया नमन माझें ॥१२॥

नमन माझें देवराया। नमन माझें गौरीतनया ॥
भालचंद्रा मोरया । तुझें चरणीं नमन माझें ॥ १३ ॥

नाहीं आशा स्तुतीची ॥ नाहीं आशा तव भक्तीची ॥
सर्व प्रकारें तुझिया दर्शनाची ॥ आशा मनीं उपजली ॥ १४ ॥

मी मूढ केवळ अज्ञान ॥ ध्यानीं तुझे सदा चरण ॥
लंबोदरा मज देई दर्शन ॥ कृपा करी जगदीशा ॥ १५ ॥

मति- मंद मी बालक । तूंचि सर्वांचा चालक ॥
भक्तजनांचा पालक ॥ गजमुखा तूं होशी ॥ १६ ॥

मी दरिद्री अमागी स्वामी ॥ चित्त जडावें तुझिया नामीं ॥
अनन्य शरण तुजला मी ॥ दर्शन देई कृपाळुवा ॥ १७ ॥

हें गणपतिस्तोत्र जो करी पठण ॥ त्यासी स्वामी देईल अपार
धन ॥ विद्या सिद्धीचे अगाध ज्ञान || सिंदूरवदन देईल पैं ॥ १८ ॥

त्यासी पिशाच्च भूत प्रेत ॥ न बाधिती कदा- काळांत ॥
स्वामीची पूजा करोनी यथा- स्थित ॥ स्तुतिस्तोत्र हें जपावें ॥ १९ ॥

होईल सिद्धी षण्मास हें जपतां ॥ नव्हे कदा असत्य वार्ता ॥

गणपतिचरणीं माथा ॥ दिवाकरें ठेविला ॥ २० ॥

॥ इति श्रीगणपतिस्तोत्रं संपूर्णम् ॥

॥ श्रीगजाननार्पणमस्तु ॥